ॐ

# अभ्यासक्रम

## श्री समर्थ शारदा सुगम संगीत संस्था

(भारत सरकार कौशल्य विकास मंत्रालय तसेच युवा कार्य व क्रीडा मंत्रालय पुरस्कृत संस्थांनी मान्यता व संलग्नता दिलेली नोंदणीकृत संस्था)

नोंदणी क्र. :- एफ्/१५६९६ ठाणे महा /२५५/०७/ ठाणे

## संस्थेच्या सुगम संगीत परीक्षांचा स्वीकृत केलेला अभ्यासक्रम

सौ. वीणा रानडे-परळीकर (उपाध्यक्ष)

द्वारा प्रस्तुत

श्री समर्थ शारदा सुगम संगीत संस्थेच्या परीक्षांचे
स्वीकृत अभ्यासक्रम

प्रस्तुतकर्ती
सौ. वीणा (रानडे) परळीकर
मोबा. ९८२०९४९८२१

प्रकाशक
सौ. वीणा (रानडे) परळीकर
दळवी वाडा, राममारुती रोड, दूधनाका, कल्याण (प.)
दूरध्वनी : ०२५१-२२०९११८

मुद्रक
अक्षर मुद्रण, कल्याण

मूल्य रुपये १५/- मात्र

आवृत्ती ५ वी दि. ७/१/२०२०

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

सदर अभ्यासक्रम हा सौ. शिवाली पारेकर लिखित व प्रकाशित 'व्यवसायाची नवी दिशा' या पुस्तकातील एक प्रकरण नं. ६ चा भाग आहे. सदर पुस्तकाचे हक्क राखीव आहेत (Copyright No. L28577/2007). सदर प्रशिक्षण व परिक्षण पध्दतीचा लिखित, ध्वनिफित वा चित्रफितीच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे परवानगीशिवाय उपयोग करणे हा कॉपीराईटच्या नियमानुसार गुन्हा आहे.

# सुलभ अभ्यासक्रम

# मोठ्या वयोगटासाठी

(सर्व परीक्षा तोंडी असतील. लेखी पेपर नाही.)

## गीत प्रथमा

१) गीते : एकूण तीन गीते. ज्यामध्ये कोणतेही तीन वेगवेगळे गीतप्रकार असावेत.

२) ताल : दोन ताल. दादरा व केहरवा. माहिती व प्रात्यक्षिक (हाताने दाखविणे)

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यातील क्र. १ ते २

४) सर्वसाधारण माहिती : यामध्ये गीतकार, संगीतकार, गायक या घटकांचे कार्य व त्याविषयी माहिती.

५) काव्यवाचन : अर्थ भावानुसार काव्यवाचन. (जी गीते शिकविली त्यामधून एक साधकाने निवडून काव्यवाचन करणे)

## गीत द्वितीया

१) गीते : एकूण पाच गीते. भक्तीगीत, भावगीत, अभंग, अंगाईगीत व भूपाळी.

२) ताल : दादरा, केहरवा, भजनी (वारकरी) माहिती व प्रात्यक्षिक (हाताने दाखविणे)

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यातील क्र. १ ते ३

४) सर्वसाधारण माहिती : मागीलप्रमाणे

५) सभागायन : वरीलपैकी साधकाने निवडीचे एक गीत सभेपुढे सादर करणे.

६) रागसंगीत : राग भूप माहिती व आरोह-अवरोह (सरगम नाही)

७) काव्यवाचन : मागीलप्रमाणे

## गीत तृतीया

१) गीते : एकूण दहा गीते. भक्तीगीत, भावगीत, अभंग, अंगाईगीत व भूपाळी हे गीत प्रकार हवेत.

२) ताल : दादरा, केहरवा, भजनी (वारकरी), रुपक माहिती व प्रात्यक्षिक (हाताने दाखविणे)

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यातील क्र. १ ते ४

४) सर्वसाधारण माहिती : मागीलप्रमाणे. शिवाय साथीच्या वाद्यांचा परिचय गायक व वादकांची बसण्याची स्थाने.

५) सभागायन : परीक्षेसाठी शिकलेल्या दहा गीतांपैकी साधकाने निवडलेले एक गीत सभेपुढे सादर करणे.

६) रागसंगीत : राग भूप व यमन यांची माहिती व आरोह-अवरोह (सरगम नाही)

७) काव्यवाचन : परीक्षकांनी दिलेल्या कवितेचे.

## गीत मध्यमा

१) गीते : एकूण पंधरा गीते. ज्यात मागील सर्व प्रकार व गौळण, गझल

२) ताल : मागील सर्व म्हणजे दादरा, केहरवा, भजनी (वारकरी), रुपक आणि झपताल

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यातील क्र. १ ते ५

४) सर्वसाधारण माहिती : मागीलप्रमाणे. शिवाय सादरीकरण, श्रोत्यांशी संवाद याविषयी माहिती.

५) सभागायन : साधकाचे निवडीचे एक गीत व परीक्षकांचे निवडीचे एक गीत अशी दोन गीते सभेपुढे सादर करणे.

६) रागसंगीत : राग भूप, यमन आणि बागेश्री यांची माहिती व आरोह-अवरोह (सरगम नाही)

७) काव्यवाचन : मागीलप्रमाणे

## गीत उपांत्य

१) गीते : एकूण अठरा गीते. ज्यात मागील सर्व प्रकार व एक गीत झपतालामधील.

२) ताल : दादरा, केहरवा, भजनी (वारकरी), रुपक आणि झपताल (माहिती व प्रात्यक्षिक) तबल्यावर वाजविलेले ताल ओळखणे.

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यातील क्र. १ ते ७. गीत गायनात स्थायी अंतरा एका स्वरावर सुरू करताना स्वरालंकाराचा कसा उपयोग होतो याची माहिती व प्रात्यक्षिक.

४) सर्वसाधारण माहिती : मागीलप्रमाणे. शिवाय स्पर्धांचे संदर्भात गीताची निवड, सादरीकरण, परीक्षण वगैरे.

५) सभागायन : साधकाचे निवडीचे एक गीत व परीक्षकांचे निवडीची दोन गीते अशी तीन गीते सभेपुढे सादर करणे.

६) रागसंगीत : राग भूप, यमन, बागेश्री आणि मालकंस यांची माहिती व आरोह-अवरोह (सरगम नाही)

७) काव्यवाचन : परीक्षकांनी दिलेल्या कवितेचे.

## गीत विशारद

१) गीते : एकूण गीते वीस. ज्यामध्ये मागील सर्व गीतप्रकार हवेत.

२) ताल : मागील सर्व अभ्यासक्रम

३) स्वरालंकार : मागील सर्व क्रमांक १ ते ७

४) रागसंगीत : राग भूप, यमन, बागेश्री, मालकंस व तोडी यांची माहिती व आरोह-अवरोह (सरगम नाही)

५) काव्यवाचन : मागीलप्रमाणे

६) सर्वसाधारण माहिती : मागील सर्व अभ्यासक्रम

७) सभागायन : मागील परीक्षेप्रमाणे तीन गीते सादर करणे.

साधकाने आपले नाव, परीक्षेचे नाव, केंद्र, परीक्षा तारीख या माहितीसह गीतप्रकार व गीताचे शीर्षक लिहून त्यांची यादी सादर करावी. परीक्षेसाठी सभागायन, काव्यवाचन वगैरेसाठी परीक्षकांना या यादीतील गीते निवडायची असतात. सदर यादीमध्ये गीतकार, संगीतकार, स्वरपट्ट्या, ताल वगैरे माहितीची आवश्यकता नाही.

## गीत अलंकार (भाग १)

### पार्श्वभूमी :-

श्री समर्थ शारदा सुगम संगीत संस्थेने, सतरा (१७) परीक्षांच्या त्रिस्तरीय अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे. त्यापैकी एक म्हणजे मोठ्या वयोगटासाठी 'सुलभ अभ्यासक्रम' या अंतर्गत सहा परीक्षांचा अभ्यासक्रम (सहावी परीक्षा गीत विशारद पर्यंतचा) आहे. संस्थेशी संलग्न असलेल्या संचालकांच्या अनेक विद्यार्थ्यांनी तो पूर्ण केला आहे. त्या विद्यार्थ्यांनी यापुढे काही शिकायचे असते. म्हणून त्यांना

झेपेल असा, उपयुक्त व फारसा कठीण नसणारा अभ्यासक्रम तयार केला जावा अशी मागणी होत आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी नवीन अभ्यासक्रमाची निर्मिती करणे गरजेचे होते.

## उद्देश :-

उपरोक्त मागणीची पूर्तता करताना, केवळ गरजेची पूर्तता एवढाच उद्देश ठेऊन चालणार नव्हते. अभ्यासक्रम निर्माण केला तर त्याची बहुविध उपयुक्तता असायला हवी. संस्थेच्या तज्ज्ञ सदस्यांमध्ये ह्यावर चर्चा झाल्या. त्यामधून असे लक्षात आले की, गीत विशारद पर्यंत शिकलेले साधक, हे स्वर, ताल, स्वरालंकार, निवडक राग, काव्यवाचन, विविध गीतप्रकार अशा मूलभूत गोष्टींची किमान प्राथमिक जाण संपादन केलेले असतात. म्हणून नवीन अभ्यासक्रम करताना, गीत विशारदपर्यंत विविध गीत प्रकारातील किमान वीस गाणी साधकाने शिकलेली असतात. याचा उपयोग त्यांना कार्यक्रम करण्यासाठी व्हायला हवा. त्यांना त्यांच्या कार्यक्रमाचे निवेदन करता यायला हवे. किमान काही वेळ एकट्याने कार्यक्रम करण्याचा आत्मविश्वास संपादन करायला हवा हा हेतू ध्यानात ठेवला, तर अन्य भागकडील गोष्टींची द्विरुक्ती टाळून सादरीकरण या गोष्टीकडेच पूर्ण लक्ष द्यायला हवे. थोडक्यात गीत विशारद झालेले साधक, आत्मविश्वासाने एकट्याचा कार्यक्रम सादर करण्याचा आत्मविश्वास संपादन करतील. हा हेतू नवीन अभ्यासक्रम निर्मितीत असावा, असा सर्व चर्चांचा सूर होता. त्यानुसार नवीन अभ्यासक्रमाचे खालीलप्रमाणे उद्देश ठरविण्यात आले.

- नवीन अभ्यासक्रमात थेअरीचा भाग नसावा.
- ताल, सूर, स्वरालंकार, काव्यवाचन, रागसंगीत आणि सर्वसाधारण माहिती हा भाग पूर्णपणे वगळण्यात यावा.
- एका स्वरावर गाणे, वाद्याशिवाय गाणे यांनाही पूर्णपणे फाटा द्यावा. परीक्षकांचा चॉईस, साधकांचा चॉईस या गोष्टी नसाव्यात.
- साधकाने विविध गीत प्रकार असलेली दहा गीते ही 'सभागायन' अथवा 'कार्यक्रम' करण्याच्या पध्दतीने सादर करावीत. त्याला फक्त हार्मोनियम आणि तबला अथवा मृदुंग एवढ्याच वाद्यांची साथ असावी.
- कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत जाणारा असावा.
- साधकाने स्वतःच गाण्याचे निवेदन करावे.
- परीक्षेमध्ये साधकाने गरज पडल्यास वहीचा वापर करावा.

- निवेदन मात्र लिहिलेले वाचून दाखवू नये. एकूण काय श्रोत्यांशी सतत संवाद राहिल असे सादरीकरण हवे.
- कार्यक्रमात गीते निवडताना गीतप्रकाराप्रमाणेच तालाची विविधता असावी. सादरीकरणाचा क्रम लावत असताना प्रथम कोणते गीत गावे, शेवट कशाने करावा याविषयीचे पारंपारिक संकेत पाळले जावेत. (उदा. भैरवीने शेवट करावा. सुरुवात भूपाळी/ गणेश वंदना याने व्हावी.)

## गीत अलंकार पार्ट (१) परीक्षेचा अभ्यासक्रम

### गीते संख्या : १० गीते

### गीत प्रकार :

भावगीत, भक्तीगीत, गवळण, अभंग, भूपाळी हे गीतप्रकार आवश्यक. हे गीतप्रकार असलेली किमान सात गीते असावीत व उर्वरीत तीन गीते ही लावणी, पोवाडा, गोंधळ, जोगवा, भारुड, अंगाई, गझल यापैकी चालतील. अर्थात दहाच्या दहा गाण्यांमध्ये उपरोक्त - भक्तीगीत, भावगीत, अभंग, गवळण व भूपाळी हेच गीतप्रकार असले तरीही चालतील. (उदाहरणार्थ एखाद्याने तीन भक्तीगीते, तीन भावगीते, दोन अभंग, एक गवळण व एक भूपाळी अशी दहा गीते निवडली तरी चालतील किंवा याप्रमाणेच निवडावीत. तसेच भूपाळी या गीतप्रकारातील एकाहून अधिक गीते नसावी.) संकल्पनांवर आधारित सादरीकरणाचा पर्याय निवडल्यास त्यामध्ये वरील गीतप्रकारांची सक्ती नसेल.

### निवेदन :

निवेदन स्वतःचे स्वतः करावे. गीतकार, संगीतकार याचा उल्लेख शक्यतो निवेदनात व्हावा. (ध्वनीमुद्रीत गीत असल्यास गायक/गायिकेचे नाव सांगणे आवश्यक नाही.) निवेदन माफक असावे. लिखित निवेदन वाचून दाखवू नये.

### सादरीकरण :

तबला/मृदुंग व हार्मोनियम अशी किमान दोनच संगत वाद्ये असावीत. श्रोत्यांशी संवाद आवश्यक.

साधकाने गीताच्या यादीच्या नमुन्याप्रमाणे दोन प्रती परिक्षकांस सादर कराव्यात. (पान क्र. ८ वर नमुना आहे.)

यादीच्या एका प्रतीवर प्रत्येक गाण्याचे किती नंबरचे कडवे (अंतरा) गावे असे परिक्षकाला अपेक्षित आहे, ते परिक्षक सूचित करतील. त्यानुसार दहा गाणी

(प्रत्येकी एक-एक अंतरा) सभेपुढे सलग सादर करणे अपेक्षित आहे. एक प्रत संस्थेच्या दप्तरी राहिल. संस्थेद्वारा साधकांना प्रमाणपत्रे पाठविली जातील. ज्यामध्ये फक्त ग्रेडचा A.B.C. किंवा O.S. उल्लेख असेल.

**पात्रता :**

श्री समर्थ शारदा सुगम संगीत संस्थेची गीत विशारद उत्तीर्ण (अन्य संस्था विद्यापीठे, गांधर्व महाविद्यालय यापैकी कोणत्याही स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण असले तरी या संस्थेची गीत विशारद पूर्ण केल्याशिवाय गीत अलंकार परीक्षेला बसता येणार नाही.)

## गीत अलंकार पार्ट (१) पुढील परीक्षा

यापुढील प्रत्येक परीक्षेत उपरोक्त सर्व अटी तशाच राहतील, फक्त पुढील परीक्षेत गीतांची संख्या प्रतिवर्षी दोन प्रमाणे वाढत राहिल.

या परीक्षा कार्यक्रमाप्रमाणेच 'सभागायन' पध्दतीने घेतल्या जातील हे लक्षात घेऊन तशी व्यवस्था होणे अपेक्षित आहे. संबंधीत संचालक त्यानुसार व्यवस्था करतील ही अपेक्षा आहे.

ॐ

श्री समर्थ शारदा सुगम संगीत संस्था

गीतांची यादी

परीक्षा गीत अलंकार पार्ट ——

साधकाचे नांव :- श्री/सौ/कु.

| क्र. | गीतप्रकार | गीत | [illegible] | निवेदन [illegible] पैकी | [illegible] २० पैकी | [illegible] २५ पैकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| १० | | | | | | |
| | | एकूण | | | | |

[illegible]

|| ॐ ||

# बाल विभाग

## (शालेय स्तर : ६ ते ११ वयोगटातील विद्यार्थी)

## बालविभागासाठी स्वतंत्र प्रशिक्षण, परिक्षण याची आवश्यकता व त्याचा विचार

### स्वतंत्र अभ्यासक्रमाची गरज

सुगम संगीताचे वर्ग गेली १७ वर्षे चालवितांना एक महत्वपूर्ण गोष्ट जाणवली ती अशी की, सर्वसाधारणपणे मूल ५/६ वर्षांचे झाले की, पालकांना त्यांनी ज्या गोष्टी आत्मसात कराव्याशा वाटतात, त्यामध्ये संगीत या विषयाचे प्रमाण लक्षणीय आहे. हा विषय ६ ते ११ वयोगटातील मुलांना यावा, याविषयीच्या आवडीची तिव्रता देखील खूप दिसते. अर्थात, 'संगीत' म्हटलं की, त्यात काय शिकावं याचे पर्याय - १) गायन २) वादन आणि ३) नर्तन हे होत. त्यातल्या कंठ संगीतावर बोलायचं म्हटलं तर, कंठसंगीत शिकण्यासाठी उपलब्ध प्रकार दोन. एक रागदारी संगीत व दुसरे सुगम संगीत. विद्यापीठस्तरावरील अभ्यासक्रमाचा विचार करण्याचा हा वयोगटच नव्हे. त्यामुळे रागदारी संगीतासाठी 'गांधर्व महाविद्यालय' व सुगम गीतासाठी आमच्या संस्थेचे अभ्यांसक्रमच उपलब्ध आहेत. गांधर्व महाविद्यालयाच्या फक्त काही परीक्षा या वयोगटातील विद्यार्थी देऊ शकतात. एकूण काय तर ६ ते ११ या वयोगटातील मुलांसाठी प्रतिवर्षी निदान एक परीक्षा घेतली जावी असा सुयोग्य अभ्यासक्रम असणे ही एक निश्चित गरज होती. त्यानुसार खालील अभ्यासक्रम तयार केले आहेत.

### (हेतू - संस्कार करणे, संस्कारांचे स्वरूप)

शालेय स्तरांवरील मुलांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रमाची गरज आहे हे जाणवल्यावर पुढे प्रश्न उपस्थित झाला की त्या अभ्यासक्रमाचा हेतू, छंद भागवता भागवता काय काय मिळावे हा असावा ? याबाबत असे वाटते की, कलेची आवड, छंदाची आवड भागवता भागवता सहजपणे त्यांच्यावर संस्कारही करता आले तर बरे. अर्थात इथे संस्कार म्हणजे धार्मिक संस्कार अपेक्षित नाहीत. संस्कार म्हणजे सुरांचे ज्ञान, तालाचे ज्ञान, लयीचे ज्ञान, स्वरालंकाद्वारे श्रुतींच्या स्थानाचे ज्ञान. ज्याचा उपयोग पुढे रागसंगीत बैठक पक्की होण्यासाठी व्हावा. संस्कार म्हणजे वाणी चांगली होण्यासाठी उपयुक्त संस्कार, संस्कार म्हणजे प्राणायाम, ॐकार साधना, काही शारीरिक एक्झरसाईज, ज्यांचा

उपयोग आरोग्यासाठी व्हावा. संस्कार म्हणजे काव्यातील वेगवेगळ्या वृत्तांच्या चाली शिकण्यात व्हावा. संस्कार म्हणजे राष्ट्राच्या अभिमानास्पद परंपरा लोप पावल्या जाऊ नयेत म्हणून त्याची ओळख होण्यासाठी व त्या जतन होण्यासाठी व्हावा असे इथे अभिप्रेत आहे. अभ्यासक्रम बनविताना त्या अनुषंगाने संस्कार करणे हा सुध्दा एक हेतू आहे. म्हणून श्लोक, आरत्या, पोवाडे यांचा अंतर्भाव केला आहे. सहा परीक्षांमधून प्रतिवर्षी नियमितपणे म्हटल्या जाणाऱ्या सर्व प्रमुख आरत्यांचा समावेश आहे.

समाजामध्ये वावरताना, सामाजिक तसेच वैयक्तिक अशा काही गरजा असतात. ज्यांचा संगीताशी संबंध आहे. त्या गरजा भागविण्याची सक्षमता शालेवयीन मुलांमध्ये यावी हा एक चांगला हेतू वाटतो. यामध्ये काय अभिप्रेत आहे ते सोदाहरणानेच सिद होईल. सामाजिक गरजा म्हणाल तर कार्यक्रमातून ईशस्तवन, स्वागतगीत, राष्ट्रगीते मुलांना गाता यावी ही रास्त अपेक्षा असते. त्याचा अंतर्भाव प्रशिक्षणात असणे उचित वाटले.

## काव्यप्रकारांच्या अंतर्भावाची पार्श्वभूमी

वरील सर्व हेतू लक्षात घेऊन ६ ते ११ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी ६ परीक्षांचा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे तयार केला आहे. त्याचा तपशील देण्यापूर्वी पुन्हा एकदा नमूद केलं तरी चालेल की, येथे कोणताही धार्मिक विचार केलेला नाही. देशामध्ये हिंदू लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्याने स्वाभाविकपणे हेतू साध्य करताना घेतले जाणारे काव्यप्रकार वैदिक धर्मातील वाटतील. पण ॐकाराचे प्रकार पाहायला गेलं तर ॐकाराच्या प्रकारातील एकात्मता ॐकारामध्ये - आमेन, आमिन, ओमेगा, ॐ असे बहुधर्मीय मंत्र समाविष्ट आहेत. काव्यप्रकारची भाषा कोणती असावी याविषयी एकभाषिय आग्रहही नाही. मात्र काव्यप्रकारात अनिवार्य गीतप्रकारांखेरीज जी अधिक गीते शिकवावी लागतील त्याचा आशय आणि विषय त्या त्या वयोगटाला अनुरुप असा हवा. थोडं सोदाहरण बोलायच झाल तर, या वयोगटातील मुलांनी केवळ बालगीतेच म्हणावी, गौळण किंवा लावणी म्हणू नये असा नाही. परंतु गंभीर तत्वज्ञानाचा आशय असलेली गीते या मुलांना झेपतील का याचा विचार प्रशिक्षकाने करावा. 'विठ्ठला तू वेडा कुंभार', अथवा 'जग हे बंदिशाला' अशा गाण्यातील तत्वज्ञान या वयोगटातील मुलांच्या आकलनात येणे कठीण आहे. (प्रशिक्षकांना विचाराची दिशा देण्यासाठी ही उदाहरणे दिली आहेत.)

या परीक्षांचे नामांकन करताना इंग्रजी शब्दप्रयोग वापरले आहेत. याचे एकच कारण म्हणजे ते अतिशय प्रचलित आहेत. ते वापरल्याने वयोगटाचा अंदाज येतो.

॥ ॐ ॥

# परीक्षांचा अभ्यासक्रम

(बालविभाग वयोगट : ६ ते ११)

## (सर्व परीक्षा मौखिक (तोंडी) असतील. लेखी पेपर कोणत्याही परीक्षेत नाही.)

### सुगम संगीत प्ले ग्रुप परीक्षा

१) गीते : या परीक्षेला एकूण चार गीते शिकविणे अभिप्रेत आहे. यातील विद्यार्थी साधारणपणे इ.१ लीची शालेय परीक्षा पास झालेला असेल. त्याला राष्ट्रगीत व कोणतीही तीन बालगीते यावीत अशी अपेक्षा आहे.

२) आरती : 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही गणपतीची तसेच 'दुर्गे दुर्घट भारी' ही देवीची पारंपारिक अशा दोन आरत्या म्हणता येणे अपेक्षित आहे.

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यातील क्र. १ व २

४) ताल : दोन ताल, दादरा व केहरवा त्यांची माहिती (स्वतंत्र तक्त्यामध्ये पाहावी.) व प्रात्यक्षिकासह म्हणजे हाताने टाळी देऊन तोंडाने बोल म्हणून दाखविणे.

५) राग : राग 'भूप' त्याची माहिती (स्वतंत्र तक्ता) सांगणे, आरोह, अवरोह, लक्षणगीत किंवा सरगमगीत गाणे.

६) श्लोक : परीक्षेसाठी कोणतेही ३ श्लोक येणे आवश्यक आहे. परंतु इथे अपेक्षा अशी आहे की, प्रतिवर्षी श्लोकांची संख्या जशी वाढत जाईल. तसतशी विविधता वाढावी. विविधतेमध्ये अभिप्रेत काय आहे ? तर वेगवेगळ्या वृत्तांचा समावेश केला जावा. म्हणजे वृत्तछंदातील विविधतेनुसार त्यामध्ये असलेल्या गेयतेचे किंवा चालीचे संस्कार या प्रशिक्षणात घडावे. मनाचे श्लोक, १८ श्लोकी गीता यांतील श्लोकांचा अंतर्भाव करायला हरकत नाही. अमुक एक भाषेतीलच श्लोक असावे असा आग्रह मात्र नाही. श्लोक हे नामाभिधान, सूचकतेपुरतं केलं आहे. यामध्ये आर्या, दिंडी, साकी इ. काव्यप्रकारांचा समावेश असायला हरकत नाही.

७) ॐकार : न्यूख ॐकार व गजर. (डॉ. जयंत करंदीकर प्रणित उदरश्वसनाधारित ॐकार साधनेचा ONCV ओएनसीव्ही अभ्यासक्रमातील काही भाग इथे समाविष्ठ केला आहे. त्यामुळे ॐकार उच्चारणाची नावेही त्याप्रमाणेच दिली आहेत.)

## सुगम गीत नर्सरी

१) गीते : एकूण गीते ६ ज्यामध्ये 'जन गण मन', वंदे मातरम व ४ बालगीते.

२) आरती : एकूण ३ आरत्या. ज्यामध्ये मागील वर्षी झालेली गणपती, देवीची आणि 'लवथवती विक्राळा' ही शंकराची आरती.

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यांमधील क्र. १, २, ३

४) ताल : मागील वर्षीचे दादरा, केहेरवा आणि वारकरी

५) रागगायन : मागील वर्षीचा सर्व अभ्यासक्रम व 'यमन' राग प्रतिवर्षी एक रागसंख्या वाढविली जाईल. त्या त्या प्रत्येकाचे आरोह, अवरोह, सरगमगीते, लक्षणगीते शिकवले जावे हे अपेक्षित.

६) श्लोक संख्या ६ (इतर सर्व मागील परीक्षांप्रमाणे)

७) आवाजशास्त्र (ॐकार उच्चारण) : न्यूख, बीज व गजर

## सुगम गीत ज्युनिअर

१) गीते : एकूण गीते ८ ज्यामध्ये 'जन गण मन', 'वंदे मातरम', देशभक्तीपर गीत व ५ बालगीते.

२) आरती : मागील ३ आरत्या व मारुतींची 'सत्राणे उड्डाणे' ही आरती.

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यांतील क्र. १ ते ५

४) ताल : दादरा, केहेरवा, वारकरी, त्रिताल

५) राग : मागील सर्व व 'बागेश्री' राग

६) व्याख्या : एकूण १८ व्याख्यांचा स्वतंत्र तक्ता दिला आहे. त्यापैकी १ ते ८ व्याख्या तोंडी विचारल्या जातील.

७) श्लोक : कोणतेही ९

८) स्पीच (उच्चार) : देवनागरी लिपीमधील १६ स्वरांची उच्चारणे शिकविणे, त्यासाठी जीभ, ओठ, वरील हिरडी, दांत, टाळू यांच्या साहाय्याने कोणत्या प्रकारचा आकार धारण करायला हवा, श्वासदाबाची गरज, दीर्घ उच्चारण आणि संयुक्त वर्णांच्या उच्चारासाठी कशी कमी-अधिक लागते ते शिकविणे अभिप्रेत आहे.

९) ॐकार : न्यूख, बीज, नाद, रेलगाडी ॐकार. परिक्षक त्याची प्रात्यक्षिके विचारतील ती दाखविणे.

## सुगम गीत सिनिअर

१) गीते : कोणतीही १० गीते, ज्यामध्ये 'जन गण मन', 'वंदे मातरम', देशभक्तीपर गीत, ईशस्तवन, स्वागतगीत आणि ५ बालगीते.

२) आरत्या : मागील ४ व दत्ताची 'त्रिगुणात्मक त्रैमूर्ती' ही आरती

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यांतील क्र. १ ते ७

४) ताल : दादरा, केहरवा, वारकरी, त्रिताल व रुपक

५) राग : मागील सर्व व राग मालकंस

६) व्याख्या : स्वतंत्र तक्त्यातील १ ते १३

७) श्लोक : एकूण १२

८) स्पीच (उच्चार) : देवनागरी लिपीमधील १६ स्वर व ३६ व्यंजने अशा ५२ वर्णांचे उच्चार शिकविणे. ज्यामध्ये जीभ, दात, ओठ, टाळू, हिरडी यांच्या साहाय्याने प्रत्येक वर्णाचा उच्चार करतांना कसा आकार होतो व कसा श्वासदाब लागतो हे शिकविणे अभिप्रेत.

९) ॐकार : न्यूंख, बीज, नाद, शक्ती, एकात्मता ओंकार व चायनीज प्राणायाम प्रकार १

## सुगम गीत सेकंडरी पार्ट - १

१) गीते : एकूण गीते १२ ज्यामध्ये 'जन गण मन', 'वंदे मातरम', देशभक्तीपर गीत, ईशस्तवन, स्वागतगीत, अभंग, गौळण व बालगीते.

२) आरत्या : मागील ५ व पांडुरंगाची 'युगे अठ्ठावीस' अशा ६ आरत्या.

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यांतील क्र. १ ते ७

४) ताल : मागील सर्व व झपताल

५) राग : मागील सर्व व राग 'तोडी'

६) व्याख्या : स्वतंत्र तक्त्यातील १ ते १८

७) श्लोक : एकूण १५

८) स्पीच : मागील सर्व

९) ॐकार : न्यूख, बीज, नाद, शक्ती, रेलगाडी, एकात्मता, साम ओंकार व चायनीज प्राणायाम क्र. १ व २

# सुगम गीत सेकंडरी पार्ट - २

१) गीते : एकूण गीते १५ ज्यामध्ये 'जन गण मन', 'वंदे मातरम', देशभक्तीपर गीत, ईशस्तवन, स्वागतगीत, पोवाडा, अभंग, गौळण, भूपाळी, भावगीत, भक्तीगीत व बालगीते.

२) आरती : मागील सर्व

३) स्वरालंकार : स्वतंत्र तक्त्यांतील क्र. १ ते ८

४) ताल : मागील सर्व

५) राग : मागील सर्व

६) श्लोक : एकूण १८

७) व्याख्या : स्वतंत्र तक्त्यातील १ ते १८

८) स्पीच (उच्चारण) : मागील सर्व

९) ॐकार : मागील सर्व

## स्वरालंकाराचा तक्ता

क्र. १ आरोह - सा रे ग म प ध नी सां
अवरोह - सां नि ध प म ग रे सा

क्र. २ आरोह - सारेग, रेगम, गमप, मपध, पधनी, धनीसां
अवरोह - सांनीध, नीधप, धपम, पमग, मगरे, गरेसा

क्र. ३ आरोह - सारेगम, रेगमप, गमपध, मपधनी, पधनीसां
अवरोह - सांनिधप, नीधपम, धपमग, पगमरे, मगरेसा

क्र. ४ आरोह - सारे, रेग, गम, मप, पध, धनी, नीसां
अवरोह - सांनी, नीध, धप, पम, मग, गरे, रेसा

क्र. ५ आरोह - साग, रेम, गप, मध, पनी, धसां
अवरोह - सांध, नीप, धम, पग, मरे, गसा

क्र. ६ आरोह - साम, रेप, गध, मनी, पसां
अवरोह - सांप, नीम, धग, परे, मसा

क्र. ७ आरोह - सारे, साग, साम, साप, साध, सानी, सासां
अवरोह - सांनी, सांध, सांप, सांम, सांग, सारे, सांसा

क्र. ८ आरोह - सारेगम, मगरे, रेगमप, पमग, गमपध, धपम, मपधनी, नीधप, पधनीसां

अवरोह - सांनीधप, पधनी, नीधपम, मपध, धपमग, गमप, पमगरे, रेगम, मगरेसा

## तालासंबंधी माहितीचा तक्ता

### दादरा -

मात्रा ६, भाग (खंड) - २ (३, ३), टाळी - पहिल्या मात्रेवर (समेवर) काल (खाली) चौथ्या मात्रेवर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| धा | धी | ना | धा | ती | ना |
| सम | | | काल | | |
| × | | | ० | | |

**केहेरवा** - मात्रा ६, भाग (खंड) - २ (२, २), टाळी - पहिल्या मात्रेवर (समेवर) काल (खाली) तिसऱ्या मात्रेवर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| धागे | नती | नक | धिन |
| सम | | काल | |
| × | | ० | |

**वारकरी** - मात्रा ८, भाग (खंड) - २ (४, ४), टाळी - पहिल्या मात्रेवर (समेवर) काल (खाली) पाचव्या मात्रेवर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| धीन् | धाधीन् | धी | ना | धीन् | धतीन् | ती | ना |
| × | | | | ० | | | |
| सम | | | | काल | | | |

**रूपक** - मात्रा ७, भाग (खंड) - ३ (३, २, २)

टाळ्या - २ (चौथ्या व सहाव्या मात्रेवर), काल - समेवर (पहिल्या मात्रेवर)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ती | ती | ना | धी | ना | धी | ना |
| ० | | | १ | | २ | |

*झपताल* - मात्रा १०, भाग (खंड) - ४ (२, ३, २, ३) टाळ्या - ३ (पहिल्या, तिसऱ्या आणि आठव्या मात्रेवर), काल - सहाव्या समेवर

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धीन् | ना | धीन् | धीन् | ना | तीन् | ना | धीन् | धीन् | ना |
| × | | २ | | | ० | | ३ | | |

*त्रिताल* - मात्रा १६, भाग (खंड) - ४ (४, ४, ४) टाळ्या - ३ (पहिल्या, पाचव्या आणि तेराव्या मात्रेवर), काल - नवव्या मात्रेवर

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धा | धीं | धीं | धा | धा | धीं | धीं | धा |
| × | | | | २ | | | |

| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धा | तिं | तिं | नां | ता | धीं | धीं | धा |
| ० | | | | ३ | | | |

## व्याख्यांचा तक्ता

१) मात्रा : ज्या आकड्यांनी ताल मोजला जातो त्याला मात्रा म्हणतात.

२) सम : तालाची १ (पहिली) मात्रा म्हणजे सम-खूण ×

३) काल : तालाचे जे भाग असतात, त्या भागातल्या पहिल्या मात्रेला जर आघात नसेल तर ती मात्रा टाळी न वाजवता दाखवतात, त्याला काल म्हणतात. खूण-०

४) बोल : मात्रा न म्हणता ताल ज्या अक्षरांनी मोजला जातो त्याला बोल असे म्हणतात.

५) ताल : गायन वादन चालू असतांना आपण हाताने जो ठेका धरतो त्याला ताल म्हणतात.

६) स्वर : गायन वादनासाठी उपयोगी असणाऱ्या नादाला स्वर म्हणतात.

७) वादी : रागातील मुख्य स्वर. वादी स्वर रागात वारंवार गायला जातो.

८) संवादी : वादीला मदत करणारा स्वर

९) स्थायी : गीताचा पहिला भाग

१०) अंतरा : गीताचा दुसरा भाग

११) आरोह : स्वरांचा चढता क्रम

१२) अवरोह : स्वरांचा उतरता क्रम

१३) आलाप : अनेक स्वरांचे गायनाने विस्तारलेले रुप, काही आलाप तालबध्द असतात, तर काही तालबध्द नसतात.

१४) स्वरमालिका/सरगम : तालात बांधलेली स्वररचना.

१५) कोमल स्वर : आपल्या स्थानापासून अर्धा स्वर जेव्हा खाली येतो तेव्हा तो कोमल स्वर होतो. कोलम स्वरांचे खाली आडवी रेघ देतात. उदा. रे ग ध नी

१६) तीव्र स्वर : आपल्या स्थानापासून अर्धा स्वर जेव्हा वर चढतो तेव्हा त्याला तीव्र स्वर म्हणतात. तीव्र स्वरांचे वर उभी रेघ देतात. उदा. मं

१७) आवर्तन : पहिल्या मात्रेपासून शेवटच्या मात्रेपर्यंत ताल म्हणून झाला की एक आवर्तन झाले. असे म्हणतात.

१८) स्वर सप्तके : एकूण सप्तके व त्यांच्या खूणा

१) मंद्र सप्तके : स्वराच्या खाली टिंब

२) मध्य सप्तक : स्वरांना कोणतेच चिन्ह नसते.

३) तार सप्तक व अतितार सप्तक : स्वरांच्या वर टिंब असते.

## राग-भूप

वादी - ग, वर्ज्य स्वर - म, नी

संवादी - ध, गायनाची वेळ - रात्रीचां पहिला प्रहर

आरोह - सा रे ग प ध सां अवरोह - सां ध प ग रे सा

### सरगम-ताल त्रिताल

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थायी : | ग | प | ग | रे | सा | रे | ध | सा | ग | ऽ | ग | रे | ग | प | ध | ऽ |
| | ० | | | | ३ | | ० | | × | | | | | | | |
| | ग | ऽ | ग | रे | ग | प | ध | सां | ध | सां | ध | प | ग | रे | सा | रे |
| | ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |
| अंतरा : | ग | ऽ | प | ध | सां | ऽ | सा | सां | सां | रें | गें | रें | सां | रे | ध | सां |
| | ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |
| | ग | रे | सां | ध | रें | सा | ध | प | सां | सां | ध | प | ग | रे | सा | रे |
| | ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |

# राग यमन

१) वादी - ग, २) संवादी - नी, ३) जाती - संपूर्ण (कारण यात ७ स्वर आहेत.)
४) गान प्रहर - रात्रीचा पहिला प्रहर

आरोह : नी रे ग म॑ ध नी सां ।

पकड : नीरे ग रे सां, प म॑ ग

अवरोह : सां नी ध प म॑ ग रे सा ।

### सरगम-ताल त्रिताल

**स्थायी**

| | | | |
|---|---|---|---|
| नी ध ऽ प | म॑ प ग म॑ | प ऽ ऽ ऽ | प म॑ ग रे |
| ० | ३ | × | २ |
| नी रे ग रे | ग म॑ प ध | प म॑ ग रे | ग रे सा ऽ |
| ० | ३ | × | २ |

**अंतरा**

| | | | |
|---|---|---|---|
| ग म॑ ध नी | सां ऽ ऽ ऽ | सां ऽ सां सां | नी रें सां ऽ |
| ० | ३ | × | २ |
| नी रें गं रें | नी रें सां ऽ | सां नी ध प | म॑ ग रे सा |
| ० | ३ | × | २ |

# राग बागेश्री

१) वादी - म, संवादी - सा, (ग, नी कोमल), आरोहात रे वर्ज्य, या रागात 'प' स्वरही वर्ज्य आहे. पण काही गायक अवरोहात 'प'चा अल्पसा प्रयोग करतात.

आरोह - सा, ग॒ म ध नि॒ सां अवरोह - सां नि॒ ध, मग॒रेसा

गाण्याची वेळ - मध्यरात्र

### सरगम-ताल त्रिताल

**स्थायी**

| | | | |
|---|---|---|---|
| सां सां नी नी | ध म प ध | ग॒ ऽ रे सा | रे ऽ सा ऽ |
| ० | ३ | × | २ |
| सा ऽ नी ध | सा ऽ सा सा | म ध नी ध | म ग॒ रे सा |
| ० | ३ | × | २ |

**अंतरा**

| | | | |
|---|---|---|---|
| ग॒ म ध नी | सां ऽ सां सां | नी सां रे सां | नी सां नी ध |
| ० | ३ | × | २ |
| ध नी सां ग॒ | रें ऽ सां ऽ | मध नीसा रेंसां नीध | मध नीध मग॒ रेसा |
| ० | ३ | × | २ |

## राग मालकंस

वादी - म, संवादी - सा, ग-ध-नी कोमल, 'रे' व 'प' वर्ज्य, गाण्याची वेळ मध्यरात्र

आरोह : सा ग म ध नी सां अवरोह : सा नी ध म ग सा

### सरगम (ताल-त्रिताल) स्थायी

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | म | ग | सा | नी | सा | ध | नी | सा | ऽ | म | ऽ | ग | म | ग | सा |
| ग | म | ध | नी | ध | म | ऽ | म | गम | धनी | सांनी | धनी | सांसा | नीध | मग | सा |
| ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |

### अंतरा

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | म | ध | नी | सां | ऽ | सां | ऽ | नी | सां | ऽ | सां | गं | नी | सां | ऽ |
| ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |
| नी | ऽ | नी | ऽ | सा | ऽ | सीं | ऽ | गम | धनी | सांऽ | ऽ | धनी | धम | गम | गसा |
| ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |

## राग तोडी

वादी - ध, संवादी - ग, (रे-ग-ध कोमल, म तीव्र) गाण्याची वेळ सकाळ,

आरोहात : 'प' वर्ज्य, अवरोहोत : 'प'चा उपयोग कौशल्याने करतात.

आरोह : सा रे ग म॑ ध नी सां । अवरोह : सां नी ध प म॑ ग रे सा ।

### सरगम

### स्थायी

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रे | ग | रे | सा | नी | सा | ध | ऽ | ग | ऽ | ऽ | ऽ | रे | ग | रे | सा |
| ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |
| सा | रे | ग | म॑ | ध | ऽ | ध | ऽ | म॑ | ध | म॑ | ग | रे | ग | रे | सा |
| ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |

### अंतरा

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | ऽ | म॑ | ध | नी | ऽ | सा | ऽ | रें | गं | रें | सां | नी | सां | ध | ऽ |
| ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |
| सां | रें | गं | रें | नी | सां | ध | ऽ | ध | ऽ | म॑ | ग | रे | ग | रे | सा |
| ० | | | | ३ | | | | × | | | | २ | | | |